# ज्ञान प्रबोधिनी

# स्त्री-शक्ती प्रबोधन

## (ग्रामीण)

स्वाधार प्रकल्प जैवविविधता पुस्तक प्रकाशन कार्यक्रम




स्वाधार प्रकल्प सौर दिवे भेट




किशोर - किशोरी विकास प्रकल्प
सज्जनगडावर निवासी शिबीर



# वार्षिक वृत्त

राष्ट्रीय शके १९४३-४४
(सन २०२३-२४)

शिवणवर्ग - प्रमाणपत्र वाटप कार्यक्रम



कातकरी विकास - आषाढी दिंडी





संक्रांत मेळावा - वाजेघर




सहनिवास दशकपूर्ती निमित्ताने
आजी-माजी विद्यार्थिनींचा मेळावा



आरोग्य तपासणी कॅम्प



कोफोर्ज कंपनी भेट



दात तपासणी



संपदा प्रकल्प महिलांना उद्योगासाठी खेळते भांडवल दिले



स्वाधार प्रकल्प मेळावा




भारतीताई खासबागे यांना नवदुर्गा पुरस्कार



आहिल्याबाई होळकर पुरस्कार



संपदा प्रकल्प - नाचणी लाडू प्रशिक्षण



नवी उमेद - कातकरी वस्तीवरील हिरकणी

# ज्ञान प्रबोधिनी : स्त्री-शक्ती प्रबोधन (ग्रामीण)

## वार्षिक वृत्त

**राष्ट्रीय सौर शके १९४५-४६ (सन २०२३-२४)**

### ◈ कामातील नवीन भर ! ◈

नमस्कार,

ज्ञान प्रबोधिनीच्या स्त्री-शक्ती प्रबोधन (ग्रामीण) विभागाचे २०२३-२४ वर्षांचे वृत्त हाती देताना आनंद होत आहे. बचत गटांच्या कामापासून सुरू झालेल्या कामाचे २४-२५ हे तिसावे वर्ष आहे. म्हणता-म्हणता या कामाने बरीच मजल गाठली. आता काम करणारा बहुतेक सर्व गट हा दुसऱ्या किंवा तिसऱ्या फळीचा आहे. आधीच्या पिढीपेक्षा थोडा जास्त शिकलेला गट! यंदा हा गट नियोजन करून काम करायला शिकला. गटाने २०२३-३३ या १० वर्षांचा भवितव्य लेख लिहिला. या २३-२४ वर्षात भवितव्य लेखात लिहिल्याप्रमाणे कामे केली. विशेष म्हणजे, 'आम्ही ठरवले आहे म्हणून काम करायची जबाबदारीही आमचीच आहे' असे गटाला वाटत आहे त्यामुळे यंदा विशेष भर पडली ती नवीन कामाची!

आपल्याच उपक्रमातून तयार झालेला हा नव्या दमाचा स्थानिक कार्यकर्त्यांचा गट कामाला उभा राहिला.. आणि अगदी रामदास स्वामींनी सांगितल्या प्रमाणे 'जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे!' या भावनेतून विस्तारासाठी बाहेरही पडला. हिरकणी गटाने मावळ, भोर, शिक्रापूर (शिरूर) या तालुक्यात स्वतः जाऊन विस्तार केला.. तर काही जिल्ह्यात प्रशिक्षण घेतले. एक दोन वर्षांत त्याचे परिणाम दिसतील. वेल्ह्याला शालेय मुलींसाठी चालवलेल्या निवासाची यंदा दशकपूर्ती होती, आता युवतींसाठी नवीन वास्तू बांधून त्यात जास्त मुलींच्या निवासाची व्यवस्था होऊ शकेल असे विस्तारायचे काम सुरू झाले, तर संपदा प्रकल्पाच्या निमित्ताने भोर तालुक्यातील दुर्गम गावात स्वयंरोजगार प्रशिक्षण निमित्ताने आपण नवीन गावात कामाला सुरुवात केली.

ग्रामीण भागातील ज्ञान प्रबोधिनीच्या स्त्री-शक्ती प्रबोधनाचे काम, महिलांच्या बचत गटापासून सुरू झाले. मग किशोरींसाठी, युवतींसाठी असे वेगवेगळ्या वयोगटांसाठी, गरजेवर आधारित काम सुरू करून ज्येष्ठ महिलांपर्यंत अशा सर्व वयोगटात विस्तारत गेले. आर्थिक उपक्रमांपासून सुरू झालेले हे काम औपचारिक-अनौपचारिक शिक्षणापासून आरोग्य, स्वयंरोजगार या बरोबरच नेतृत्व विकसनापर्यंत पोचले. विस्ताराचा विचार करताना मात्र बचत गटाचे काम करताना त्या अनुषंगाने जी-जी कामाची गरज जाणवली त्यावर नव्याने काम सुरू केले. त्या प्रत्येक विषयाला घेऊन बाहेर जावे असे आज वाटत आहे. या वर्षी अशी काही विषयांची / उपक्रमांची घडी बसली. विस्तारासाठी जाणाऱ्या कार्यकर्त्यांची तयारी होण्याबरोबरच एखादा उपक्रम घेण्यासाठी तो कसा घ्यायचा याच्या प्रशिक्षण पुस्तिका, परीक्षणाच्या मुद्द्यांची यादी असे सगळे तयार झाले ही या वर्षीची जमेची बाजू!

सुवर्णा गोखले, विभागप्रमुख

**◆ ज्ञान प्रबोधिनी संस्थेचे पदाधिकारी ◆**

| **◻ अध्यक्ष** | **◻ उपाध्यक्ष** | **◻ कार्याध्यक्ष** | **◻ संचालक** |
|---|---|---|---|
| डॉ. रघुनाथ माशेलकर | डॉ. विजय केळकर | डॉ. श. बा./रवि पंडित | डॉ. गिरीश श्री. बापट |
| | | | **◻ कार्यवाह** |
| | | | श्री. महेंद्र सेठिया |

# देणगीदार

**(१ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ )**

◈ **रु. ५,०००/- पर्यंत ६ जणांनी देणगी दिली.**

◈ **रु. ५,०००/-**

१) संजीवनी कुलकर्णी ३) प्रकाश कुलकर्णी ५) ममता महाबळ ७) धनंजय वडेर
२) सागर चुरी ४) घनश्याम भिडे ६) गायत्री सेवक

◈ **रु. ५,०००/- ते रु. १०,०००/-**

१) कॅ. मोहन दामले ३) वर्षा नाडकर्णी ५) सुनीती तुळापुरकर ७) शुभांगी राव ९) स्मिता खरे ११) अभया टोळ
२) सुहास कडलसकर ४) रोहिणी जोशी ६) राहुल लिमये ८) नागेश चाटेकर १०) अल्का पटवर्धन

◈ **रु. ११,०००/- ते रु. २१,०००/-**

१) श्रिया टिळक ३) सुहासिनी बिवलकर ५) सुचेता माणिकर ७) शिवानी पाटणकर
२) रश्मी गोखले ४) विनायक खांदवे ६) अनघा बागुल

◈ **रु. २५,०००/-**

१) संहिता लेले ३) पद्मजा जोशी ५) मंजुषा लिमये, ७) डी. व्ही. ब्रम्हे अँड सन्स सेल्स अँड सर्व्हिसेस प्रा. लि.,
२) जितमन्यु गांधी ४) जिव्हाळा फाऊंडेशन ६) बी. लक्ष्मीदेवी राव ८) आरती चव्हाण २७,०१५/-

◈ **रु. ४०,०००/-**

१) सोनाली जयस्वाल २) डॉ. रसिका गुप्ता

◈ **रु. ५०,०००/- ते रु. १,००,०००/-**

| | | | |
|---|---|---|---|
| १) सरिता भट | ५०,०००/- | ५) प्रज्ञा मंदार गोडबोले | ९२,०००/- |
| २) रविंद्र आपटे | ५०,०००/- | ६) वरूण वष्ट | १,००,०००/- |
| ३) अमित कुलकर्णी | ५०,०००/- | ७) उमदा समाज विकास प्रतिष्ठान | १,००,०००/- |
| ४) मिलिंद दर्प | ६६,०००/- | ८) ब्रिगे. रविंद्र पळसोकर | १,००,०००/- |

◈ **रु. १ लक्ष पेक्षा जास्त**

| | | | |
|---|---|---|---|
| १) खुशबू चॅरीटेबल ट्रस्ट | १,०५,८००/- | ८) बोस्टन सायंटीफिक टेक्नॉलॉजी अँड इंजि. सर्विसेस प्रा.लि. | ८,८५,०००/- |
| २) सविता भागवत | १,२८,०००,/- | ९) सायबेज आशा ट्रस्ट | ९,००,७२०/- |
| ३) अमरेंद्र कृष्णाजी जोशी | ३,५०,०००/- | १०) ग्लोबंट इंडिया प्रा. लि. | २२,००,०००/- |
| ४) रोटरी क्लब पुणे गांधीभवन | ३,६९,६५९/- | ११) कोफोर्ज बिझीनेस प्रोसेस सोल्युशन प्रा. लि. | ४७,००,०००/- |
| ५) हेल्थ एज टेक्नॉलॉजीज इंडिया प्रा. लि. | ४,१२,५००/- | १२) ज्ञान प्रबोधिनी फाऊंडेशन, अमेरिका | ४५,४६,२४९/- |
| ६) ना. ग. परांजपे प्रतिष्ठान | ६,८०,०००/- | | |
| ७) ॲग्रेको एनर्जी रेंटल इंडिया प्रा. लि. | ६,८६,१५८/- | | |

❀❀❀

**✻ वरील देणगीतून २०२३-२४ या वर्षात खालील प्रकल्प राबवले गेले. ✻**

- **स्वयंरोजगाराशी संबंधीत** – धनश्री, संपदा, हरित ऊर्जा शेती प्रकल्प
- **पर्यावरणाशी संबंधीत** – स्वाधार
- **आरोग्याशी संबंधीत** – आरोग्य सखी
- **अन्य** – खेळते भांडवल अर्थसखी नवरात्र मेळावे, युवोन्नती
- **उपेक्षित समाजासंबंधित** – जास्वंद गिरीकन्या निवास बालवाडी, एकल महिला कातकरी विकास प्रकल्प

**★ वर्षभर छोटे-मोठे मिळून २८ प्रकल्प सुरू होते. ★**

# आर्थिक स्वावलंबन वाढविणे

## ▣ बचत गट

ज्ञान प्रबोधिनीने मार्गदर्शन केलेल्या जिजामाता प्रबोधन केंद्राच्यावतीने ६० गावांत १८० बचत गट चालू आहेत. किमान १०० रु. पासून ते २०००/– रु. मासिक बचत करणारे बचत गट आहेत. सर्व गट एकूण १३ विभागांशी जोडलेले आहेत. १.७६ कोटी बचतीवर २५५५ सभासदांनी मिळून या वर्षी बँकेतून साधारण ८४ लाख कर्ज गटांना मिळाले त्यासाठी आपण काम केले. एकूण गटांना ४ कोटीपेक्षा जास्त कर्ज दिले गेले. दरवर्षी मार्च अखेर गटांचा हिशोब केला जातो. या वर्षी गटात झालेल्या उलाढालीचा तक्ता –

**१ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ हिशेब**

| क्र. | विभाग | गट | सभासद | बचत | कर्ज | येणेबाकी | व्याज |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | राजगड | ७ | १२० | ३,४२,३०० | ७,३०,७६० | ४,००,००० | १,०८,२६१ |
| २ | नवदिशा | ९ | १६० | ८,४२,७०० | १७,७८,४२० | ७,२७,९५२ | ३,२३,९४४ |
| ३ | शिवरे | १३ | २६८ | १७,३५,००० | ५०,०८,२०० | २३,२८,६७९ | ८,४२,४८० |
| ४ | खोपी | १२ | १९० | २२,८९,४०० | ९०,९४,३७० | ६७,६७,६७० | ८,९३,२०६ |
| ५ | पारवडी | १० | १९६ | ९,३१,७०० | २२,४४,५१० | ११,१३,१५० | ४,६७,७८३ |
| ६ | नवचेतना | १६ | २५७ | १०,४९,९०० | १४,६७,४१३ | १०,१२,२२५ | ३,०६,१५९ |
| ७ | पासली | १४ | २०५ | ४,३७,२०० | ११,५७,८१४ | ३,३१,३०४ | १,२०,०९३ |
| ८ | सांगवी | २० | ३२८ | १५,००,९२० | १०,८८६,४०० | ८१,१२,०८६ | १२,५९,३०२ |
| ९ | कासुर्डी | ८ | १३३ | ५,९४,३४० | ९,५३,००० | ५,५९,१५९ | १,३८,१७८ |
| १० | शाश्वत | १३ | २३५ | १०,८४,१०० | ३४,५३,४३२ | २१,८९,९३२ | ६,१५,२८६ |
| ११ | शिवापूर | १३ | २६८ | ५९,९२,९०० | ११,६८,१०२ | ६३,१०,०५८ | ४,३१,३५६ |
| १२ | वेल्हे | ४ | ७१ | ५,५०,५०० | ८,५०,९९३ | ३,६५,२७६ | १,२७,९६१ |
| १३ | संपदा | १० | १२४ | ३,१७,००० | २१,३६,७५० | १६,५२,८५० | १,२४,६४६ |
| | **एकूण** | **१४९** | **२,५५५** | **१,७६,६७,९६०** | **४०,९३०,१६४** | **३,१८,७०,३४१** | **५७,५८,६५५** |

• **खेळते भांडवल -** या वर्षी खेळते भांडवल निधीतून उत्पादन वाढीसाठी वैयक्तिक गुंतवणूक करणाऱ्या ५१ जणींना ५.७५ लाख रुपये खेळते भांडवल देण्यात आले. त्यांनी छोटे उद्योग/घरगुती उद्योग व शेळीपालन यासाठी भांडवल वापरले. ५१ पैकी ३९ महिला अतिशय दुर्गम भागातल्या होत्या, त्यांनी शेळी खरेदी केली.


सेंट्रल बँकेतून बचत गटांना कर्ज वाटप


खेळत्या भांडवलातून जाधववाडी गावात घेतलेल्या शेळ्या

# स्वयंरोजगार

स्वयंरोजगारासाठी या वर्षी संपदा, हरित ऊर्जा शेती प्रकल्प, स्वाधार प्रकल्पातील काही भाग व ४ केंद्रांवर प्रकल्प चालू होते.

### ▣ संपदा प्रकल्प

१. सोंडे हिरोजी, सोंडे सरपाले, सोंडे माथना, वडगाव झांजे, सुरवड, दामगुड आसनी, मंजाई आसनी, भागीनघर, सोंडे कार्ले या नऊ गावांमध्ये चालू असणाऱ्या संपदा प्रकल्पासाठी १४ बचत गट स्थापन केले. सर्व गटांमध्ये मिळून २३४ महिलांचा समावेश आहे. १४ गटांचा मिळून संपदा विभाग सुरू केला. नऊ गावांतून लहान–मोठे व्यवसाय करणाऱ्या ८१ महिला उद्योजिका तयार झाल्या. आपल्या प्रयत्नांमुळे ३५ महिलांना २०,०००/– ते २५,०००/– रु. मिळाले. १४ बचत गटांच्या माध्यमातून ६४ महिलांनी २१,७९,५००/– रु. चे उद्योगासाठी खेळते भांडवल घेतले. सायबेज कंपनीच्या अर्थ साहाय्यातून हा प्रकल्प चालू आहे .

२. सायबेज खुशबू संस्थेच्या कामाचा भाग म्हणून भोरमधील बारे खुर्द व बारे बुद्रुक या नवीन गावांतील महिलांसाठी फॅशन डिझाईनिंगचा प्रशिक्षण वर्ग घेण्यात आला. या वर्गात एकूण २० महिला सहभागी झाल्या होत्या.

३. **गावांमध्ये कौशल्य प्रशिक्षणे :** या वर्षी स्वयंरोजगाराची ६० प्रशिक्षणे गावागावांत घेतली. ४५९ महिला त्यात सहभागी होत्या. स्वयंरोजगाराची विशेष कौशल्ये शिकवणारी २२ प्रशिक्षणे झाली व त्याचा २३४ महिलांनी लाभ घेतला.

४. **विक्री व्यवस्था :** महिलांनी केलेल्या उत्पादनांची विक्री करण्यासाठी ३९ स्टॉल लावले. त्या माध्यमातून ४,४२,२९४/– रु. ची विक्री झाली. तसेच डाएटकिट मधून रु. ४,२७,५००/–उत्पादन केले. या शिवाय अन्य मार्गांनी गटांनी रु. ५,२१,३५७/–ची विक्री केली.



**सायबेज खुशबू - बारे गावात शिवणवर्ग**

५. **शेतसहल अनुभव :** या अंतर्गत ८० पर्यटक शेत सहलीला येऊन गेले.

६. **आर्थिक कागदपत्रे चोख करणे :** प्रकल्प अंतर्गत १४१ लोकांचे आर्थिक कागदपत्रे चोख करण्याचे काम केले. त्यात आधारकार्ड, पॅन कार्ड काढणे/ लिंक करणे अशी कामे झाली.

### ▣ हरित ऊर्जा प्रकल्प

या प्रकल्पाचे हे दुसरे वर्ष! आडवली, अस्कवडी, मार्गासनी या वेल्ह्यातील तीन गावांतील ३३ शेतकऱ्यांनी मिळून १०३ प्लॉटवर ४४ एकर जमिनीवर १२ ते १४ फूट उंच वाढणारे नेपियर गवत लावले. या निमित्ताने १३ एकर पडीक जमीन वापरली गेली. सर्व शेतांना पाणी दिले, गवताची कापणी केली. प्रकल्पाचा भाग म्हणून ५० कुटुंबांना पंखा असणाऱ्या,



**हरित ऊर्जा प्रकल्प**
**शेतकऱ्यांनी शेतात लावलेले नेपियर गवत**

पेलेटवर (इंधन कांडी) चालणाऱ्या आधुनिक चुलींचे वाटप केले. या प्रकल्पात कापणी केलेल्या गवतापासून इंधन कांडी बनवायला गटातील महिला शिकल्या. त्यांनी मार्च महिन्यापर्यंत ३ टन इंधनकांडीचे उत्पादन केले. उद्योग करायला गावात भाड्याने शेड घेतली. ऑफिस बांधकाम केले. प्रकल्पासाठी गावकऱ्यांच्या ४० बैठका झाल्या. गावकऱ्यांच्या सहभागाने चालू असणाऱ्या या प्रकल्पाचे काम 'हरित ऊर्जा महिला बचत गट' बघत आहे. कुठल्यातरी प्रकारे १०५ जणांना प्रकल्पाचा थेट लाभ मिळाला. कोणाची जमीन लागवडीखाली आली तर कोणाची मोटार पाणी द्यायला वापरली. कोणाचा ट्रॅक्टर मशागत करायला वापरला तर कोणाला मजुरीची रक्कम मिळाली. कमीतकमी २४,००० ते जास्तीत जास्त १,१२,०००/– अशी रक्कम गावकऱ्यांना मिळाली. ग्लोबंट इंडिया लिमिटेड या कंपनीच्या निधीतून हा प्रकल्प चालू आहे.

## ▣ धनश्री प्रकल्प

धनश्री प्रकल्प हा शिवापूर केंद्र, नसरापूर केंद्र, आंबवणे केंद्र व वेल्हे केंद्र या केंद्रांवर स्वयंरोजगार प्रशिक्षणासाठी चालतो. या गावात केलेले उत्पादन विक्रीसाठी पुणे केंद्रात येते. या वर्षी चार केंद्रांवर मिळून २२४ महिलांसाठी १९ प्रकारची प्रशिक्षणे घेतली. त्यानंतर काहींनी व्यावसायिक तत्त्वावर उत्पादन सुरू केले. यामध्ये शिवणवर्ग (शिवणामध्ये प्रशिक्षणाबरोबरच बाळंतविडे शिवून देणे), पार्लर वर्ग, मसाले, स्लिंग पर्स, बटवे बनवणे, मण्याचे आकाशकंदील, क्विलिंगचे दिवे बनवणे व वाळवणाचे विविध प्रकार असे होते. दर महिन्याला या प्रकल्पाची त्या-त्या केंद्रावर बैठक होते.

## ▣ राम-सीता पुराणिक तंत्रनिकेतन

शिवापूरला चालू तंत्र निकेतनाचे हे २५वे वर्ष! तंत्रनिकेतनात ११ प्रकारची कौशल्य प्रशिक्षणे घेतली. नाचणी पापड, राखी प्रशिक्षण, गौरी, गणपती हार, मण्याचे आकाशकंदील, महिरप, चॉकलेट मोदक, शिवणवर्ग, थ्रेडचे दागिने, क्विलींग, रांगोळी या प्रशिक्षणांना मिळून ४१ महिला सहभागी झाल्या. यातील ऑर्डर घेऊन काम करून देणाऱ्या १० महिला आहेत. या शिवाय तंत्र निकेतनात भरतनाट्यम्चा वर्गही चालू आहे. याशिवाय एक नवा विषय हाताळला तो म्हणजे आधुनिक चुली असेंबल करणे व त्यांची दुरुस्ती करणे. या वर्षी असे २७३ चुलींचे दुरुस्तीचे काम केले.

धनश्री प्रकल्प ज्ञान प्रबोधिनी फौंडेशन, अमेरिका यांच्या अर्थसाहाय्यातून झाला.

## ▣ उर्मी प्रकल्प

१. वाजेघर भागात उर्मी प्रकल्प सुरू केला. स्वयंरोजगार प्रशिक्षण झाले त्यातून खाद्य पदार्थ करून विकले. वर्षभरात साधारण एक लाख रुपयांची विक्री झाली.

## ▣ विक्रीची जोड

आर्थिक स्वयंपूर्णतेसाठी महिलांनी केलेल्या उत्पादनाला विक्रीची जोड आवश्यक आहे. पुणे केंद्रातून भगिनी निवेदिता बचत गटाच्या माध्यमातून राम-सीता तंत्र निकेतनमध्ये केलेल्या उत्पादनाची रु. १,२९,६८९/-, संपदा प्रकल्पातून संपदा गटाने १३,९०,९०१/- रुपयांची विक्री केली. स्वाधार १,१४,५३०/- रु. उर्मी प्रकल्पाची एक लाख रुपये तर अन्य सर्व ठिकाणची मिळून रु.६,०९,४४५/- विक्री केली. महिलांनी केलेल्या उत्पादनाच्या विक्रीतून मिळालेल्या पैशामुळे महिलेच्या हातात रक्कम खेळती रहाते, यामुळे ती अनेकदा कुटुंबाची निर्णयकर्ती होते, ग्रामीण महिलेचा आत्म सन्मान वाढतो, म्हणून आपण या गोष्टी जाणीवपूर्वक करतो.



धनश्री प्रकल्पातील पार्लर वर्गाचे प्रात्यक्षिक

## ▣ स्वाधार प्रकल्प

ज्ञान प्रबोधिनी आणि छाया (Chaaya Strategic Advisor) यांच्या संयुक्त विद्यमाने, कोफोर्ज कंपनीच्या आर्थिक साहाय्यातून गेल्या तीन वर्षांपासून वेल्ह्यातील पासली खोऱ्यातील ३ ग्रुप ग्राम पंचायतीतील ११ गावांमध्ये यंदा हा प्रकल्प चालू होता. स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळावी हा मूळ हेतू. वृत्त कालावधीमध्ये शिक्षण, आरोग्य, उपजिविका, पर्यावरण आणि ग्रामपंचायत अशा विषयांवरील कामे झाली.

१. **स्वयंरोजगार व उद्योजकता :** प्रकल्पातील १० गावांतील महिलांचे बचत गट स्थापन केले असून महिलांना १४ प्रकारच्या वस्तू बनविण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. यात विविध प्रकारचे लाडू बनविणे, भाजणी, नाचणी सत्व, दिवाळी फराळ, पापड, मेणबत्ती, कागदी पिशव्या आणि गांडूळखत बनविण्याचे प्रशिक्षण झाले. महिलांनी पदार्थ बनवून विक्रीसाठी पाठवायला सुरुवात केली. रु. १४,५३०/- चा फराळ विकला. मावळ भागात पावसाळ्यात येणाऱ्या पर्यटकांसाठी २ गावांमध्ये स्टॉल सुरू केले.
२. **पर्यावरण :** डॉ. मेधावी राजवाडे आणि डॉ. अमृता जोगळेकर या इको सत्व संस्थेच्या संस्थापिकांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक युवांच्या मदतीने गाववार बैठकी घेऊन वनस्पती, प्राणी, पक्षी यांच्या माहितीचे संकलन करण्याचे काम सुरू केले आहे. त्यावर आधारित 'कोलंबीची जैव विविधता' हे पुस्तक प्रकाशित केले.
३. **इकोमेला :** शहरातील लोकांना ग्रामीण जीवनाचा परिचय व्हावा, विविध रानभाज्यांची ओळख व्हावी, गावातील महिलांसाठी स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध व्हावी म्हणून या मेळ्याचे आयोजन केले होते. स्टॉलवर भाकरी व रानभाजीची उपलब्धी असा कार्यक्रम होता. भाज्यांची विक्री देखील झाली. २६ महिलांनी जेवण व न्याहारी बनवली. ३२ ठिकाणांहून १८२ जण सहभागी झाले.
४. **इतर :** ११ गावांतील १०४ कुटुंबाना सुधारित चुली वाटप, नेपियर गवतापासून इंधन कांडी बनविण्याचा प्रयोग करण्यासाठी १५ शेतकऱ्यांकडे नेपियर लागवड, ८० प्रकारच्या वनस्पती व काही औषधी वनस्पतींची अनुक्रमे निगडे आणि वारजे येथे लागवड केली. अत्यंत दुर्गम गावांतील १५ कुटुंबाना सौर दिव्यांचे वाटप केले.



**नवचेतना प्रकल्प मासिक बैठक**

५. **उपजिविका :** डॉ. शुक्ल या पशु वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली मासिक शेळीपालन प्रशिक्षण झाले. स्थानिक पातळीवर लसीकरण आणि औषधोपचार सुरू असून शेळीपालन करत असणाऱ्या शेतकऱ्यांचा एक शेळीपालक संघ स्थापन झाला आहे. १० गावांतील कुक्कुटपालन करणाऱ्या कुटुंबांसोबत दर ३ महिन्यांनी कोंबड्यांचे लसीकरण झाले.

६. आदर्श ग्रामपंचायत कशी असते हे पाहावे आणि या विषयातील कामाची माहिती घ्यावी यासाठी १७ सरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांची हिवरे बाजार येथे आदर्श सरपंच मा. पोपटराव पवार यांची भेट आयोजित केली.

७. **दल :** मुलांमधील शारीरिक आणि बौद्धिक विकासासाठीचे खेळ आणि विविध उपक्रमांचे आयोजन दल या माध्यमातून केले जाते.

स्वाधार प्रकल्पांतर्गत कोलंबी, नाळवट, कुसारपेठ, गेळगाणी, वरोती या पाच गावांमध्ये तसेच ना. ग. परांजपे यांच्या प्रकल्पातून पासली, केळद, निगडे, जाधववाडी, माजगाव या पाच गावांत असे एकूण १० गावांमध्ये १२ दले १८० मुलांच्या सहभागाने चालू होती. आठवड्यातून तीन दिवस प्रत्येकी दीड तास दल हा उपक्रम चालतो. शारीरिक व बौद्धिक खेळाबरोबरच गृहभेटी, पालक सभा, आर्थिकदृष्ट्या गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप असेही दलांवर झाले. ६० मुलांचे दोन दिवसांचे निवासी शिबिर झाले. कोलंबी,नाळवट आणि वरोती गावातील मुलांची पुण्याला सहल गेली. आठ गावांतील २८ मुला–मुलींनी भोर येथील मॅरेथॉन मध्ये सहभाग घेतला व द्वितीय क्रमांक मिळवला.

बोस्टन सायंटीफीक टेक्नॉलॉजी अँड इंजिनिअरींग सर्व्हि. प्रा. लि. ही कंपनी दरवर्षी स्त्री-शक्ती प्रबोधनच्या ग्रामीण कामासाठी आर्थिक मदत करते. या वर्षी त्यांनी वेल्हे येथील मुलींच्या सहनिवासासाठी लागणारे साहित्य गाद्या, टेबल, खुर्ची, सतरंज्या, संगणक असे युवतींच्या नवीन निवासासाठी लागणारे साहित्य भेट दिले. यानिमित्ताने कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी वेल्हे निवासाला भेट दिली.



# आरोग्य

आरोग्य सखी प्रकल्पांतर्गत तपासणी शिबिरे घेण्यात आली –

| क्र. | तपशील | रुग्णसंख्या | गावे | अनुधावन | शस्त्रक्रिया/ तज्ज्ञ सल्ला |
|---|---|---|---|---|---|
| १ | गरोदर महिला तपासणी | ४०४ | ७५ | ३६ | – |
| २ | बाल आरोग्य तपासणी | ४६५ | १० | १५ | १५ |
| ३ | दाताची तपासणी | २८४ | ७० | ३४ | – |
| ४ | डोळे तपासणी | ३५६ | ९ | ६ | ६ |
| ५ | कर्करोग पूर्व तपासणी | १०५ | ३५ | ६ | २ |
| | | १,६१४ | १९९ | १६० | २३ |

१. **गरोदर माता तपासणी –** पाटणकर हॉस्पिटलच्या डॉ. वैशालीताई बिनीवाले, डॉ. तनुश्रीताई थिटे आणि त्यांचे सहकारी दर महिन्याच्या तिसऱ्या बुधवारी वेल्हे येथे गरोदर माता तपासणीसाठी येतात.

२. **बालआरोग्य तपासणी –** ० ते १ वर्ष वयाच्या नवजात शिशुंची तपासणी व १ ते १४ वर्षे वयोगटातील बालकांची तपासणी अशा दोन गटांतून तपासणी झाली. गावातून ४६ मुलांच्या घरोघरी जाऊन पाठपुरावा करण्यात आला. त्यामध्ये बाळाचे वजन, उंची, डोक्याचा घेर, दंडाचा घेर यांची नोंदणी केली. या वर्षी बालआरोग्य तपासणी ७ गावांतून एकूण ३७८ मुलांसाठी करण्यात आली. यात ज्यांना पुढील तपासणीची गरज वाटली त्यांचे अनुधावन घेण्यात आले.

३. **दात तपासणी –** डॉ. वैदेहीताई केळकर, डॉ. प्रचितीताई देशपांडे, डॉ. अनुजा महाजन, डॉ. स्नेहल सहस्त्रबुद्धे यांच्या सहकार्याने दर रविवारी ज्ञान प्रबोधिनीच्या आंबवणे केंद्रात दात तपासणी होते. दात तपासणी मध्ये मुख्यतः सर्वसाधारण दात तपासणी, रूट कॅनल, दातांना क्लिप बसवणे अशा प्रकारे दातांची तपासणी व उपचार केले जातात.

४. **डोळे तपासणी –** वेगवेगळ्या गावांमध्ये मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्याची गरज आहे का? अशी संभाव्य रुग्णांची तपासणी केली जाते. या वर्षी ७ शिबिरांमधून २६५ जणांची तपासणी झाली व ६ जणांची शस्त्रक्रिया शिरवळच्या कमला मेहता रुग्णालयात मोफत झाली. रुग्णांचे कोणतेही प्रश्न असतील तर त्यांना शिरवळ मेहता रुग्णालयात पाठवले जाते.

५. **योनिमुखाचा कर्करोग तपासणी –** महिलांच्या आरोग्यामध्ये गर्भाशयाच्या कर्करोगाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात असते. यासाठी महिलांची कर्करोग पूर्व तपासणी व उपचार वेळेवर करता यावेत यासाठी गावातल्या महिलांसोबत पहिल्यांदा या विषयाची जाणीव–जागृती डॉक्टरांच्या सोबतच्या बोलण्याने होते. त्यानंतर तपासणी करून घेण्यासाठी तयारी दर्शविणाऱ्या महिलांची तपासणी केली. दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात त्याचे नमुने तपासले जातात व पुढील उपचारांची ज्यांना गरज आहे त्यांच्यावर उपचारही तिथेच होतात. रिपोर्ट वर डॉक्टर त्यांच्याशी सविस्तर बोलतात आणि त्यांच्या सर्व प्रश्नांची समाधानकारक स्पष्टीकरणे दिली जातात.

### ▣ किशोरींसाठी हिमोग्लोबिन वाढ प्रकल्प

हिमोग्लोबिन हा सुदृढ आरोग्याचा एक महत्त्वाचा घटक म्हणून हिमोग्लोबिन वाढ प्रकल्प हा उपक्रम १ जानेवारी ते ३१ मार्च २०२४ या काळात वेल्ह्यातील ९वीच्या ४६ किशोरींसाठी केला. पहिल्याच दिवशी हिमोग्लोबिन किती आहे हे माहिती होण्यासाठी शासकीय रचनेतून रक्त तपासणी केली. तपासणीमध्ये सगळ्यात कमी हिमोग्लोबिन ७.४ होते



**किशोरी रक्तवाढ प्रकल्प - डॉक्टर माहिती देताना**

तर सगळ्यात जास्त हिमोग्लोबिन १५.१ होते. जवळजवळ २५% किशोरी अशा होत्या की वाढत्या वयामध्ये ज्यांचं हिमोग्लोबिन कमी होते. हिमोग्लोबिन कमी असणाऱ्या मुलींना गोळी चालू केली. सर्वच मुलींना सोमवार ते शुक्रवार असे आठवड्यातले ५ दिवस पोषक आहार दिला. त्यामध्ये मेथी, पालक, बीटाचे परोठे, राजगिरा लाडू, शेंगदाणे लाडू दिले. ९० दिवसांनंतर सर्व मुली १० पेक्षा जास्त हिमोग्लोबिन असणाऱ्या गटात आल्या आहेत.

**ज्वाला प्रकल्प :** गेल्या वर्षभरात नऊ गावांतून एकूण ७७ चुली वाटप केल्या. या वर्षभरात चुलींची विक्री दोन प्रकल्पाअंतर्गत झाली. या चुलींसाठी एकूण आठ टन इंधन वाटप केले. यापैकी ४ टन इंधन आपल्या गटाने तयार केले. प्रकल्पात एकूण सात जणींचा गट काम करतो. या वर्षभरात सर्व जणींचा पाठपुरावा केला. बंद असणाऱ्या एकूण ४१ चुली दुरुस्तीसाठी आल्या व त्या दुरुस्त करून त्या व्यक्तींपर्यंत पोहोचवल्या. यामुळे महिलेचे चुलीसाठी लागणारे सरपण आणण्याचे काम कमी झाले. आपण दिलेल्या चुलीवर भात गॅसपेक्षा लवकर व चविष्ट होतो हेही महिलांनी सांगितले. बऱ्याच घरांमध्ये वयस्कर आजी-आजोबा आहेत त्यांना लाकूड फाटा गोळा करणे शक्य नसल्याने आपल्या चुलीचा फायदा होत आहे, अशी माहिती पाठपुरावा करताना लक्षात आली. या चुलीच्या वापरामुळे वृक्षतोड कमी झाली व पर्यावरणाचा ऱ्हास कमी झाला, व धुर नसल्यामुळे आरोग्यावरही चांगला परिणाम झाला.

❀❀❀

# समूहगुण विकसन

### ▣ किशोर-किशोरी विकास उपक्रम

कल्याण, कुसगाव, वरवे, कुरुंगवडी या गावांतील शाळेत ८वीच्या वर्गावर जुलै २०२३ ते फेब्रुवारी २०२४ या कालावधीत विद्याव्रताच्या १८ तासिका घेतल्या. हे तास घेण्यासाठी व मुलांना मार्गदर्शन करण्यासाठी श्रिया संस्थेमधून योगशिक्षक व प्रबोधिनीच्या माजी विद्यार्थिनींचा सहभाग होता.

**निवासी शिबिर :** दि. ६ व ७ जाने. ला सज्जनगडावर दोन दिवसांचे निवासी शिबिर आयोजित केले होते. या शिबिरात कुसगाव, कल्याण, वर्वे, कुरुंगवडी या चार शाळांतील ५६ मुली व ६० मुले असे एकूण - ११६ जण सहभागी होते.

शिबिरात गट करणे, गटातील मुलांना वेगवेगळ्या जबाबदाऱ्या देणे, सैनिकांना कृतज्ञता पत्र लिहिणे, गटात पोस्टर बनवणे, प्रसंग नाट्य सादर करणे, लघुपट बघणे व त्यावर चर्चा तसेच सज्जनगडावरील गडफेरी, गड स्वच्छता, पहाटेची आरती, अभिषेक, मनाचे श्लोक पठण, उपासना असे स्वरूप होते. या शिबिरात २०११-१२ या वर्षात विद्याव्रत घेतलेल्या वर्षाताई डिंबळे, सपनाताई गुळवे, ऋषिकेशदादा डिंबळे या तिन्ही ताई-दादांचे अनुभवकथन मुलांसाठी प्रेरक ठरले.

सर्व मुले सैनिकांना पत्र लेखन करत असताना सज्जनगडावर आलेल्या माजी सैनिक राजेंद्र भोसले यांची भेट झाली व त्यांनी सर्व मुलांशी संवाद साधला. त्यांचे किशोर वयातील अनुभव व सीमेवर काम करतानाचे अनुभव कथन केले. गट स्पर्धा - पोस्टर बनवणे स्पर्धा, प्रसंग नाट्य



**किशोर - किशोरी विकास प्रकल्प सज्जनगडावर निवासी शिबिर**

सादरीकरण व स्वच्छता तसेच वैयक्तिक स्पर्धा – पत्र लेखन अशा ४ स्पर्धांतून एकूण ४२ जणांना बक्षीस देण्यात आले.

**विद्याव्रत संस्कार कार्यक्रम** – दि. ३ फेब्रु. या दिवशी चार शाळांतील ११० विद्यार्थी–विद्यार्थिनी आणि सहनिवासातील सहा मुली अशा ११६ विद्यार्थी–विद्यार्थिनींचा विद्याव्रत संस्कार शिवनेरी मंगल कार्यालय, वरवे येथे झाला. या कार्यक्रमास तीन शाळांतील शिक्षक, पुण्यातून नियमित विद्याव्रताची सत्र घ्यायला येणाऱ्या गटातून सहा जण उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून इस्कॉनचे स्वामी अनंत दासजी मुलांना आशीर्वाद देण्यास उपस्थित होते.

**विद्याव्रत जोपासना :** गेल्या वर्षी १० मार्च २०२३ या दिवशी विद्याव्रत घेतलेल्या मुलांना आनंदमय कोशाच्या उपक्रमामध्ये, सेवा म्हणून गावातील शेतकऱ्यांची भाजी पुण्यात विक्री करण्याचा अनुभव देणे असा प्रथमच प्रयोग केला. कुरुंगवडी, वरवे, कुसगाव या तीन गावांमधील १० मुलांनी पुण्यातील सोसायटीमध्ये एकूण १०,८००/– रुपयाची भाजी विक्री एका दिवशी ३ स्टॉलवर मिळून केली.

## ▣ युवती विकास

**१. युवोन्नती प्रकल्प :** १६ ते २५ वयोगटातील ३३ विद्यार्थिनींसाठी युवोन्नती प्रकल्प घेण्यात आला. २० गावांमधून आलेल्या या युवतींना वेगवेगळ्या प्रकारची कामे करायला देऊन त्यातून त्यांच्या विविध कौशल्यांना उठाव यावा अशी योजना करण्यात आली. एकूण १२ प्रशिक्षणांमधून संवाद कौशल्य, गावपातळीवर १ली ते ७वीच्या विद्यार्थ्यांसाठी ३ तासांच्या मेळाव्याचे नियोजन करणे आणि मेळावा ४१ गावांमध्ये जाऊन घेणे असे केले. ३३ पैकी ६ युवतींनी आनंदी शिक्षणाचे प्रशिक्षण घेतले व कातकरी वस्त्यांवर जाऊन आनंदी शिक्षणाचे तास घेतले.

**२. मुंबई सहल :** सहनिवासात राहाणाऱ्या युवतींची मुंबईला सहल काढली होती. ११ युवती, ३ ताई असा १४ जणींचा गट सहभागी झाला होता. सहलीत पहिली भेट विधान भवनाला दिली. विधान भवनाचे सर्व कामकाज कसे चालते ते समजून घेतले, विधानभवनाच्या शेजारी मंत्रालय आहे तेही युवतींनी पाहिले. प्रबोधिनीच्या स्पर्धा परीक्षा केंद्राच्या माजी विद्यार्थिनी धनश्रीताई या मंत्रालयात कार्यरत आहेत त्यांनी संपूर्ण मंत्रालय फिरून दाखवले. राज्याचा कागदोपत्री सर्व कारभार कुठून चालविला जातो याची सर्व माहिती दिली.

त्या नंतर मुंबईची वैशिष्ट्ये असणारे नेहरु तारांगण, सायन्स सेंटर, गेट वे ऑफ इंडिया असे पाहून गट वेल्ह्याला परतला. प्रबोधिनीच्या शिक्षण प्रणालीमध्ये अनुभव सहली, क्षेत्र भेटी यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. असे शिक्षण आपल्या वेल्ह्यातील निवासात रहाणाऱ्या ग्रामीण मुलींचे सुद्धा आवर्जून केले जाते. यामुळे त्यांची स्वप्ने मोठी होण्यास नक्की मदत होते.

**३. बँकिंग क्षेत्राविषयी माहिती :** श्री. भूषण कोळेकर यांनी बँकिंग क्षेत्रात जाण्याची इच्छा असणाऱ्या व बी. कॉम. ची पदवी घेतलेल्या मुलींसाठी एक मार्गदर्शक सत्र घेतले. सोंडे सरपाले, कोंढावळे या दोन गावांतील ६ युवती या मार्गदर्शनासाठी सहभागी झाल्या होत्या.

**४. संगणक प्रशिक्षण वर्ग** : वेल्ह्यात १३ युवतींचा संगणक वर्ग झाला. या १३ जणींची पुणे विद्यापीठाची दूरस्थ पद्धतीने परीक्षा पुणे प्रबोधिनीत झाली. सर्व युवती चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाल्या.

**५. शिष्यवृत्ती :** गेल्या वर्षी २३ मुलींना ३.१८ लाख शिष्यवत्तीचे वाटप केली. त्यात शास्त्र शाखेला गेलेल्या मुलींना निगवेकर सरांच्या स्मरणार्थ दिलेल्या निधीतून ही शिष्यवृत्ती दिली गेली.

❀❀❀

**नवी उमेद प्रकल्पातील हिरकणींना शाबासकी**



नवी उमेद प्रकल्पात लग्नानंतर अनेक वर्षांच्या विश्रांतीनंतर ज्यांनी पदवीचे शिक्षण घेतले अशा हिरकणींचा त्यांच्या कुटुंबियांसोबत सत्कार करण्यात आला.

# नेतृत्व

### नेतृत्व बैठक

गावोगावच्या जबाबदारी घेणाऱ्या महिला महिन्यातून एकदा बैठकीला येतात. या बैठकीत गावात गेल्या महिन्यात काय केले व येत्या महिन्यात काय करणार यावर चर्चा होते. आंबवणे केंद्रात नवदिशा बैठक चालते तर वेल्हे केंद्रात नवचेतना बैठक चालते. दोन्ही बैठकीला २५-३० गावांतील प्रमुख महिला येतात. या मनुष्यबळावर आधारित नवदिशा नेतृत्व प्रकल्प केला.

**१. नवदिशा नेतृत्व प्रकल्प :** वेल्हे तालुक्यातील दुर्गम गावांतील महिला प्रतिनिधींसाठी नवदिशा नेतृत्व प्रकल्प झाला. महिन्यातून एकदा प्रकल्पाची प्रशिक्षण बैठक वेल्हे कार्यालयात घेतली. त्यात २५ गावच्या २५ महिला प्रतिनिधी येतात. ह्या वर्षी प्रकल्पाचा भाग म्हणून या गाव प्रतिनिधींनी आपापल्या गावात मेळावे तसेच स्वयंरोजगार कौशल्य प्रशिक्षण वर्ग घेतले. सगळ्या जणींनी पुण्यात एकत्र येऊन काश्मीर फाईल्स हा सिनेमा सुद्धा पाहिला.

**२. कौटुंबिक हिंसाचार :** नेतृत्व प्रकल्पातील गटाला माहिती असावे म्हणून वेल्हे पोलिस स्टेशन मधल्या सपना भुरुक ह्या महिला पोलीस आल्या होत्या. वेल्हे भागात महिला व मुलीं संदर्भात खूप केसेस पोलिस स्टेशनला येतात, त्या कशा पध्दतीने हाताळल्या जातात याची माहिती त्यांनी गटाला दिली. अन्याय करणारा जेवढा दोषी तेवढाच अन्याय सहन करणाराही दोषी असतो असेही त्यांनी सांगितले.

**३. सुरक्षा प्रकल्प –** महिलांच्या कौटुंबिक सुरक्षे संदर्भात कायद्याची माहिती असावी म्हणून गावोगावी जाऊन छोट्या गावात पोलिसांची गरज असेल तर मदत कशी घेता येईल, कुठल्या गोष्टी महिलांनी 'सहन' करता कामा नये अशी माहिती सांगणाऱ्या या प्रकल्पात पासली खोऱ्यातील नऊ गावात सुरक्षा प्रकल्पाची सत्रे झाली. त्यामध्ये ८० महिला, १० युवती व ६ पुरुष सहभागी झाले.

**४. नवरात्र मेळावे :** यावर्षी एकूण ५७ गावांत मेळावे झाले. सर्व गावांत मिळून १२८५ महिला सहभागी झाल्या. यापैकी १३ गावांत पहिल्यांदाच मेळावा घेण्यात आला. ६८ महिलांनी मिळून हे मेळावे घेतले. २९ गावांत मेळाव्याचा भाग म्हणून मेळाव्याला आलेल्या ६२३ महिलांची हिमोग्लोबीन तपासणी केली.

❀❀❀

# उपेक्षितांचा विकास

### ▣ जास्वंद गिरीकन्या मुलींचा सहनिवास वेल्हे

यंदा ८ नवीन प्रवेश व आधीच्या २० मुली मिळून २८ मुली निवासात राहून शिकल्या. ज्या मुलींना शालेय शिक्षणासाठी रोज किमान १२ किलोमीटर चालावे लागते अशा दुर्गम २० गावांतून नाममात्र शुल्क देऊन, मुली निवासात राहतात. आपल्या निवासात राहून त्या शाळा-कॉलेजला जातात. निवासातील मुलींना अभ्यासातही मार्गदर्शन मिळत असल्यामुळे सर्व मुली समाधानकारक गुण मिळवून पुढील इयत्तेत गेल्या. मुलींचा सर्वांगीण विकास व्हावा व त्यांची स्वप्ने मोठ्ठी व्हावीत यासाठी जाणीवपूर्वक योजना आखली जाते. 'शनिवार शाळा' हा उपक्रम त्यासाठी राबवला जातो. या वर्षी पेटी शिकून १२ जणींनी गांधर्व महाविद्यालयाची पेटीची पहिली परीक्षा दिली. परीक्षेत चांगले गुण मिळवून उत्तीर्ण झाल्या.

**पुणे दर्शन सहल –** ५वी ते ९वीच्या १३ मुलींची प्रभावतीताई इनामदार यांनी पुणे दर्शन सहल काढली. त्यात पुण्यातील साऊथ कमांड म्युझियम पाहून सात युद्धांची माहिती घेतली. त्यानंतर रुबी हॉल ते छत्रपती संभाजी उद्यान पर्यंत मेट्रो प्रवास केला. झपूर्झा म्युझियम मधले कला दालनही पाहिले.

१. या वर्षी प्रथमच निवासाच्या पाच देणगीदारांना त्यांच्या घरी जाऊन भेटून दिवाळी निमित्त निवासातील मुलींनी केलेल्या क्विलिंगच्या पणत्या व बेसनाचे लाडू अशी कृतज्ञतेची भेट दिली.
२. रथसप्तमी निमित्त निवासातील प्रत्येक मुलीने ५० सूर्यनमस्कार घातले.



**जास्वंद गिरीकन्या सहनिवास - शनिवार शाळा उपक्रम**

३. **राखी बनवून सैनिकांना पाठवणे :** मुलींनी स्वहस्ते राखी तयार केली. सोबत सैनिक दादांना हिंदीतून पत्र लिहून जोडले. राख्या रक्षाबंधन पूर्वी २ दिवस अगोदर नौदलातील कॅप्टन मोहन दामले यांच्याकडे पोहोचवल्या. रक्षाबंधनाच्या दिवशी मुलींनी पाठवलेल्या राख्या बांधून सैनिकांनी रक्षाबंधन सण साजरा केला. राखी बांधतानाचे व मुलींनी लिहिलेली पत्र वाचतानाचे फोटो पाठवायला सैनिक विसरले नाहीत.

४. **गणपतीसाठी ग्रामीण भागातील मुलींचे पथक :** पुण्यात मुलींचे पथक उतरून अनेक वर्षे झाली असली तरी ग्रामीण भागात हे चित्र अजूनही दुर्मिळच. गेल्या दोन वर्षांपासून सुरुवातीला ग्राम देवते समोरच्या आणि आता गणेशोत्सवाच्या मिरवणुकीत मुलींनी वादनासह पूर्ण पथक सादर केले. मुलींनी पायंडा पाडणारे बनले पहिजे या आदरणीय आप्पांच्या शिकवणीतील एक गोष्ट मुली करू शकल्या !

५. **शिष्यवृत्ती –** निवासातील एकूण दहा मुलींना ५६,०००/– रुपये शिक्षणासाठी देण्यात आले.

६. **कामाची संधी** – निवासातील ११ युवतींनी कातकरी प्रकल्पात काम करण्याची तसेच निवासातील पाचवी ते नववीच्या मुलींचे अभ्यासाचे तास घेण्याची संधी घेऊन स्वतःच्या शिक्षणाचा काही खर्च स्वतः केला.

यंदाचे वर्ष निवासाचे दशकपूर्तीचे वर्ष असल्याने १० कार्यक्रम घेतले. त्यातील महत्वाचे –

**१. निवासाच्या माजी विद्यार्थीनींचा मेळावा :** निवास सुरू केल्यापासून आजपर्यंत ४१ गावांतून ९३ मुली शिकून गेल्या. त्यांना मेळाव्याला बोलावले होते. त्यापैकी २२ युवती आल्या. काहींची लग्ने झाली आहेत, काही नोकरी करत आहेत, तर काही पदव्युत्तर शिक्षण घेत आहेत. सगळ्यांनी निवासाबद्दल मनोगत व्यक्त केले. केवळ निवासात राहिल्यामुळे पुढे त्यांना काय संधी मिळाल्या, संपर्काचा उपयोग झाला तेही मोकळेपणाने मांडले. एकेकीचे बोलणे ऐकताना निवासामुळे त्यांची आयुष्यं किती बदलली हे ऐकणाऱ्या तायांच्या लक्षात येत होते.



**सहनिवासातील मुलींची मुंबई सहल**

**२. पालकांची प्रबोधिनी परिचय सहल :** सध्या निवासात राहून शिकणाऱ्या मुलींच्या पालकांची पुण्यातील ज्ञान प्रबोधिनी वास्तू परिचय सहल काढली. १८ पालक या सहलीसाठी आले होते. पुणे प्रबोधिनीत असणारा आपला स्त्री–शक्ती प्रबोधन (ग्रामीण) हा विभाग, छात्र प्रबोधन विभाग, नैसर्गिक संसाधने विभाग, मानसशास्त्राचा अभ्यास हे संशोधन विभाग पाहिले. आणि प्रबोधिनीच्या कामाची माहिती सांगितली. या परिचय सहलीत आपली मुलगी कुठल्या संस्थेमध्ये शिकते आहे याची पालकांना ओळख झाली.

## ▣ एकल महिला

वेल्हे तालुक्यातील एकल महिलांसाठी आपण काम करतो. यात विविध सरकारी योजनांची माहिती त्यांना देणे आणि त्या योजना त्यांच्यापर्यंत पोहोचण्यासाठी मदत करणे असे करत आहोत. आजवर ४० लक्ष रुपयांहून अधिक रक्कम शासनाकडून या महिलांच्या खात्यावर आपल्या प्रयत्नामुळे जमा झाली आहे. कुंदाताईने त्यासाठी महिलांना कागदपत्राच्या पूर्ततेसाठी मदत केली .

**१. मेळावा –** अंत्रोली गावात ३६ एकल महिलांचे वैयक्तिक माहितीचे अर्ज भरून घेतले. कमी वयात एकल झालेल्या महिलांची सगळ्यात जास्त संख्या या गावात आहे म्हणून त्याच गावात मेळावा घेण्याचे ठरवले. जवळच्या गावांतूनही महिला आल्या होत्या.

**२. सहल :** एकल महिलांची सहल वाई, पाचगणी, महाबळेश्वर, प्रतापगड या ठिकाणी आयोजित केली होती. या सहलीत १५ महिला सहभागी झाल्या. ''एकल झाल्यापासून कधीच घराबाहेर गेलो नव्हतो. संस्थेने सहल काढली म्हणून बाहेर पडण्याची हिम्मत केली'' असे आलेल्या महिलांनी सांगितले.

**३. कागदपत्रे व योजनांचे काम :** वर्षभरात मिळून संजय गांधी निराधार योजनेचे १० अर्ज भरून सादर झाले. तहसील कचेरीत उत्पन्नाचे दाखले आठ जणींचे दिले तर श्रावणबाळ योजना–३, हयातीचा दाखला–१० अशी कामे झाली. कागदपत्र सादर केल्यामुळे संजय गांधी निराधार योजनेचे रु. ११०० दरमहा महिलेच्या खात्यावर जमा होतात. तसेच मुले १८ वर्षे वयाहून लहान असतील तर त्यांच्या शिक्षणासाठी पैसे मिळतात.

**४. खेळते भांडवल :** तीन एकल महिलांना ४५०००/– रु. खेळते भांडवल दिले आहे.

शासन आपल्या दारी या योजनेचे शिबिर वेल्हे येथे झाले. ११ जणींचे हयात असलेल्यांचे अर्ज भरून ते टपालाने जमा केले. हयात असलेले अर्ज दरवर्षी भरून द्यावे लागतात.

पिंपरी गावातील एकल महिलेला आपण गेल्या वर्षी शिलाई मशीन देणगीतून मिळवून दिले. त्यामुळे तिला दरमहा रु. ५,०००/– चा स्वयंरोजगार उपलब्ध होत आहे.

### ▣ कातकरी विकास प्रकल्प

२०१७–१८ या वर्षी सुरू केलेल्या या प्रकल्पात शिक्षण, आरोग्य, रोजगार, आर्थिक साक्षरता, शासकीय योजना, व्यसनाधीनता, अंधश्रद्धा अशा एकूण सात विषयांवर काम चालते. या वस्त्यांवर एकूण काम करणाऱ्या मार्गदर्शिका/प्रशिक्षिका या १९ जणी आहेत. २०२३–२४ या वर्षी मालवली, कोंढवली, धानेप, अडवली, आंबवणे, चेलाडी या सहा वस्त्यांवर नियमित व नऊ वस्त्यांवर प्रासंगिक काम केले.

**१. शिक्षण :** कातकरी समाजातील मुलांनी शिक्षणाच्या प्रवाहात यावे, चांगल्या सवयी लागाव्यात, कौशल्य विकसित व्हावीत म्हणून वेल्हे तालुक्यातील सहा वस्त्यांवर मुलांसाठी वेगवेगळ्या सत्रांचे नियोजन करण्यात आले. एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ या कालावधीत एकूण २९४ सत्रे मुलांसाठी घेण्यात आली. याचबरोबर गंमत खेळ, आषाढी एकादशी, दिवाळी, बालजत्रा, विज्ञान अशा वेगवेगळ्या विषयांवर वर्षभरात पाच मेळावे घेण्यात आले. यानिमित्ताने नियमित गोट्या आणि पत्ते खेळणाऱ्या मुलांना नवनवीन खेळ खेळता आले, इतर समाजातील मुलांबरोबर आषाढी एकादशी कार्यक्रम साजरा झाला, बालजत्रेचा अनुभव मुलांनी पहिल्यांदाच घेतला तर खेळातून विज्ञान प्रयोग मुलांना करून बघता आले.

वर्षभरात एक सहल व एक शिबिर घेण्यात आले. या सहलीचा व शिबिराचा मुख्य उद्देश हा मुलांना शाळेत जाण्याची आवड निर्माण व्हावी असा होता. त्यामुळे मुला–मुलींचे वसतिगृह बघणे, 'स्वच्छता' विषयावर चित्रफीत पाहणे, गटचर्चा, गटकार्य, हस्तकौशल्य, शाळा भेट असे विषय घेण्यात आले. यानिमित्ताने वर्षभरात नऊ वस्त्यांवरील ५ ते १५ वयोगटातील १३० मुले–मुली या सगळ्या उपक्रमांमध्ये सहभागी झाली.

**२. आरोग्य :** चेलाडी वस्तीवर सकस आहार उपक्रम पहिल्यांदाच राबवण्यात आला. या उपक्रमात ८३ मुले–मुली सहभागी झाली. यानिमित्ताने मुलांना एक वेळचा पोटभर खाऊ मिळाला. वस्तीवरील पालक मुलांच्या शारीरिक वाढीकडे लक्ष देत नसल्याने आपण दिलेल्या आहारामुळे किमान फरक लक्षात आला. दररोज आहार देण्याआधी मुलांनी अंक उजळणी म्हणावी असा आग्रह धरल्यामुळे मुलांचे १ ते ७० पर्यंतचे अंक पाठ झाले. तसेच वस्त्यांवरील लोकांचे शारीरिक स्वच्छतेकडे दुर्लक्ष होत होते त्यामुळे त्वचेचे आजार होताना दिसतात. म्हणून आपण नसरापूर वस्ती बरोबरच अजून दोन वस्त्यांवर परिसर स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, सांडपाणी व्यवस्था या विषयांवर काम केले.

**३. रोजगार :** कोंढवली, मालवली या दोन वस्त्यांवर रोजगारासंदर्भात १९ जणांसाठी मार्गदर्शन सत्रे घेण्यात आली. तसेच या दोन्ही वस्त्यांवर अडोर कंपनीच्या अर्थसाहाय्यातून बांबू प्रशिक्षण वर्ग घेतला. या वर्गात १४ युवक–युवती सहभागी झाले. असा वर्ग त्यांच्यासाठी वस्तीवर पहिल्यांदाच झाला.

**४. शासकीय कागदपत्रे व योजना :** १३ वस्त्यांवरील ३१६ लोकांच्या कागदपत्रांचे सर्वेक्षण करून १० लाभार्थ्यांना कागदपत्रे काढून देण्यात आली.

**५. आर्थिक साक्षरता :** मालवली वस्तीवर मासिक १०० रुपये बचत करणारे दोन बचत गट सुरू आहेत. या गटांमध्ये एकूण २७ महिला आहेत.

❀❀❀

### ज्ञान प्रबोधिनी फाऊंडेशन अमेरिका गटाची वेल्हे येथे भेट

- ☞ ज्ञान प्रबोधिनीच्या स्त्री–शक्ती प्रबोधन (ग्रामीण) विभागाला यंदा ज्ञान प्रबोधिनी फाऊंडेशनने भरीव आर्थिक साहाय्य दिले.
- ☞ खेळते भांडवल, धनश्री स्वयंरोजगार कौशल्य प्रशिक्षण, एकल महिला, आरोग्य सखी मुख्यतः हे प्रकल्प या अर्थसाहाय्यामुळे राबविणे शक्य झाले.
- ☞ फाऊंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनी वेल्ह्यात येऊन या प्रकल्पाच्या कामाची पाहणी केली व काम करणाऱ्या कार्यकर्त्यांसोबत वार्तालाप केला व प्रकल्पाची गरज नेमकी समजून घेतली.



## विस्तार हिरकणी

**हिरकणी विस्तार प्रकल्प :** ०-६ वयोगटात ज्यांची मुले आहेत अशा माता पालिकांचे प्रशिक्षण म्हणजे हिरकणी प्रकल्प! यंदा हिरकणी प्रकल्पाचे ११वे वर्ष होते. दरवर्षी प्रम ाणे यंदाही भोर तालुक्यातील १६ गावांत हिरकणी सत्रे झाली. त्या शिवाय हिरकणी उपक्रमाचा विस्तार करायचा ठरवला होता. या निमित्ताने विविध केंद्रांवर हिरकणी सत्राची सुरुवात झाली. चार महिने चालणाऱ्या या उपक्रमात उद्घाटन व समारोप सोडून माता पालिकांसाठी सहा प्रशिक्षण सत्रांचे नियोजन केले. या सत्रांमध्ये काय घ्यायचे याचा अनुभवातून सिद्ध झालेला अभ्यासक्रम तयार केला. सगळीकडे सारखेच प्रशिक्षण दिले जावे म्हणून प्रशिक्षण पुस्तिका तयार केली. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे अशी प्रशिक्षणे देऊ शकणारा स्थानिक भाषेत बोलणारा १८ प्रशिक्षिकांचा गट या वर्षी वेल्हे भागात तयार झाला. त्या शिवाय प्रत्येक केंद्रांवर जाऊन प्रशिक्षण घेतल्याने तेथेही असा पहिल्या टप्प्याचा गट तयार झाला. या वर्षी ३३ जणींनी मिळून ३५ ठिकाणी ४६३ माता पालिकांसाठी हिरकणी सत्र घेतली. हिरकणी प्रकल्प गेली ११ वर्षे सुरू असून आजपर्यंत आपण १४४९ मातांपर्यंत पोहोचलो आहोत.

| क्र. | केंद्र | प्रशिक्षक संख्या | ठिकाण | सहभागी माता |
|---|---|---|---|---|
| १ | भोर | ३ | १६ | २१० |
| २ | सोलापूर | ८ | ६ | ७० |
| ३ | हराळी | २ | ३ | ३५ |
| ४ | चिपळूण | ३ | १ | २२ |
| ५ | साळुंब्रे | २ | ३ | ४५ |
| ६ | मुळशी (कातकरी) | ८ | ४ | ५५ |
| ७ | शिक्रापूर | ७ | २ | २६ |
| | | ३३ | ३५ | ४६३ |

एकूण ३३ प्रशिक्षिकांनी ३५ ठिकाणी ४६३ जणींसाठी सत्रे घेतली.

ज्ञान प्रबोधिनी संशोधन संस्थेच्या सहकार्याने मुळशी तालुक्यातील ४ कातकरी वस्तीवर हिरकणी उपक्रम घेतला. हा भाग अगदी नवीन होता. गेल्या काही वर्षांत हिरकणी प्रशिक्षिका म्हणून काम करणाऱ्या ८ जणींनी याची जबाबदारी घेतली. महिन्याला २ वेळा या गावांना जाऊन वर्षभर प्रशिक्षण घेतले. हिरकणी प्रकल्प विस्ताराचे माध्यम बनला. या मातांसाठी हिरकणी सत्रासोबतच कौशल्य प्रशिक्षणाचेही प्रशिक्षण दिले. या निमित्ताने ४ वर्षं काम केल्यामुळे वस्त्यांवरील ८ जणी विकासाच्या 'चेंज एजंट' होऊ शकतात असे लक्षात आले. त्यांना अनुभवाची संधी मिळावी म्हणून ६ महिने काहीतरी काम दिल्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढला.

**नवी उमेद प्रकल्प –** नवी उमेद हा प्रकल्प भोर व वेल्हा भागात नव विवाहित महिलांसाठी चालू आहे. लग्न झाल्यानंतर महिलेचे घर/नाव सगळेच बदलते पण त्याप्रमाणे तिची 'अस्तित्वात असण्याची कागदपत्रे' मात्र बदलण्याची जबाबदारी कोणीच घेत नाही. नवी उमेद प्रकल्पा अंतर्गत आपण अशी माहिती गावागावांत जाऊन महिलांना सांगितली. अनेकींची लग्ने होऊन ५-६ वर्षं झाली होती तरी त्यांनी मॅरेज सर्टिफिकेट काढलेले नव्हते. लग्न झाल्यानंतर कागदोपत्री आणि सरकारच्या दृष्टीत अस्तित्व यावे यासाठी काही बदल लग्न झालेल्या मुलीला आणि तिच्या पालकांना करावे लागतात. लग्नानंतर आधार कार्ड व पॅन कार्ड वरील नाव बदलणे, लग्न केल्याचे प्रमाणपत्र असणे, रेशन कार्डला नाव लावणे, बँक खाते असेल तर त्यावरील नाव बदलणे यासाठी गावोगावी जाऊन प्रशिक्षकांनी गटागटांत ३०० पेक्षा जास्त जणींना माहिती सांगितली. त्यापैकी २०० जणींचे माहितीचे अर्ज भरून घेतले. कोणाला कुठल्या प्रकारच्या मदतीची आवश्यकता आहे हे त्यानिमित्ताने लक्षात आले. त्यापैकी २५ जणींचे काम प्रकल्प कालावधीत झाले. आपल्याकडे अस्तित्वाची योग्य ती कागदपत्रे नाहीत याची जाणीव-जागृती या निमित्ताने झाली.

❀❀❀



प्रशिक्षक मासिक बैठक

## ▣ संगीत वर्ग

परिणीता मराठे
उप प्राचार्या, गांधर्व महाविद्यालय, पुणे

स्त्री– शक्ती प्रबोधन (ग्रामीण) विभागात वेल्ह्याच्या परिसरात जाऊन मी काम करायला जून २०२०च्या सुमारास सुरुवात केली. पेपर क्विलिंगच्या विविध वस्तूंचे निरनिराळ्या गावांत प्रशिक्षण देताना लक्षात आले की त्या भागात संगीत कलेचे काही विशेष वातावरण नाही. माझी संगीतातील पदवी आहे त्याचा काही उपयोग या भागातील स्थानिकांसाठी करून घेता येईल का असा विचार मनात आला आणि सुवर्णाताईंपाशी तो व्यक्त केला. संगीत हे सर्व सामान्य माणसापासून ते थोरा मोठ्यांपर्यंत सर्वांच्या आयुष्याचा एक अविभाज्य आनंददायी घटक आहे. त्यामुळे त्याचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण जर दिले तर त्यातून मिळणारा आनंद वृद्धिंगत होऊ शकतो ही या उपक्रमा मागची एक प्रामाणिक भावना.

वेल्ह्यातील निवासातील मुलींपासून सुरुवात करायचे निश्चित झाले आणि २५ नोव्हेंबर २०२१ पासून स्त्री–शक्ती प्रबोधन संचालित वेल्हे येथील जास्वंद गिरीकन्या सहनिवास येथे संगीत प्रशिक्षणाचा श्री गणेशा केला. ३५ मुलींपैकी १५ जणींनी गायन आणि संवादिनी (हार्मोनियम)चे शिक्षण घेण्यास उत्साहाने सुरुवात केली. आठवड्यातून एक दिवस मंगळवार किंवा गुरुवार मी जाऊ लागले. वाराचे वेळेचे फारसे बंधन माझ्यावर नव्हते त्यामुळे सातत्य राहण्यास मदत झाली.

निवासातील मुलींव्यतिरिक्त आजूबाजूच्या गावातील स्थानिकांनाही या वर्गाचा फायदा करून देता येईल का असा विचार आला. त्यालाही सुवर्णाताईंनी होकार दिला त्यामुळे सर्व अगदी सहज सुकर झाले. अश्विनीताई ठाकर आणि तृप्तीताई कुलकर्णी यांच्या मदतीने पूर्वतयारी करून ६ मार्च २०२२ पासून आंबवणे आणि वेल्हा येथे 'सूरश्री संगीत वर्गाची' सुरुवात झाली. या प्रकल्पाकरिता गांधर्व महाविद्यालय, पुणे या संस्थेनी १५ संवादिनी वापरण्यास दिल्या तसेच माझे अमेरिका स्थित विद्यार्थी श्री. आनंद गोरे यांनी या उपक्रमासाठी ४०० अमेरिकी डॉलर आणि त्यांच्या कंपनीने ४०० अमेरिकी डॉलर असे अर्थसाहाय्य दिल्यामुळे दोन नवीन संवादिनी आणि सहा छोटे की बोर्ड घेता आले. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याला स्वतंत्र वाद्य उपलब्ध होऊ शकले. या बरोबरच शिवापूर येथील राम–सीता पुराणिक केंद्रात भरत नाट्यम् वर्गही सुरू करण्यात आला. तेथे ११ मुलींनी शिकण्यास सुरुवात केली. मानसी काळे या प्रबोधिनीच्या २०१७ च्या विद्यार्थिनीने ही जबाबदारी अगदी आनंदाने स्वीकारली. स्वातीताई शिंदे अजूनही या वर्गाची जबाबदारी सांभाळत आहेत. सध्या ५/६ जणी भरत नाट्यम् नियमित शिकत आहेत. त्यातील दोघी डिसेंबर २०२४ मध्ये प्रारंभिक भरत नाट्यम परीक्षा देणार आहेत. गांधर्व महाविद्यालय पुणे येथील कै. बाबुराव पुसाळकर संगीत गुरुकुल मधील, कार्तिक नसवाले आणि करण होनमाने (अंध विद्यार्थी) हे दोन विद्यार्थी कमवा–शिका योजने अंतर्गत येथे संगीत शिक्षण देऊ लागले. आंबवणे येथे पारवडी, मार्गासनी, आंबवणे, करंजावणे, सोंडे सरपाले अशा पाच गावांतून १५ तर वेल्हे येथे १७ विद्यार्थ्यांनी गायन व संवादिनीचे शिक्षण घेण्यासाठी प्रवेश घेतला. आंबवणे वर्गाची जबाबदारी

### विशेष वृत्त

**एखादीच शाब्बासकी समाधान देऊन जाते!**

शासनाच्या वतीने अहिल्याबाई होळकर जयंती निमित्ताने महिला व बाल विकास विभागाकडून ग्राम पंचायतीतून 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार' देण्यात आला. गावासाठी धडपडणाऱ्या गावातील कार्यकर्तीचा गावातच सत्कार करायचा कार्यक्रम करायचा आदेश होता. बहुतेक कार्यक्रम अचानक ठरले. ज्ञान प्रबोधिनी स्त्री–शक्ती प्रबोधन विभागाच्या गावातच राहून स्त्री–शक्ती प्रबोधनाचे काम करणाऱ्या पुढील १२ कार्यकर्त्यांना हा सन्मान मिळाला. आशा शिंदे, कुंदा खंडाळकर, उज्वला डांगे, सुमन जानकर, मनिषा शिळीमकर, सुमनताई शिंदे, हर्षदा झांजे, मनिषा करंजकर, रुपाली जाधव, राणी सुतार, सुनीता महाडिक, जयश्री शिळीमकर. या वर्षी पहिल्यांदाच हा पुरस्कार देण्यात आला. शाल, नारळ तसेच मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, महिला बालकल्याण मंत्री यांच्या सहिचे प्रमाणपत्र आणि स्मृती चिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप! गावात काम करणाऱ्या या कार्यकर्त्यांची नावे गावाने ठरवली याचा अर्थ तिचे नेतृत्व गावाने स्वीकारले आहे अशी पावती मिळाली!

सविताताई कुंभार आणि वेल्हे वर्गाची शैलाताई भोंडेकर यांनी आनंदाने स्वीकारली.

आवडीने मनापासून सराव करून ज्यांनी परीक्षा देण्याची तयारी केली त्या सहा महाविद्यालयीन युवती जुलै २०२२ मध्ये भारतीय संगीत प्रसारक मंडळाचे गांधर्व महाविद्यालय, पुणे यांची प्रारंभिक संवादिनी ही परीक्षा उत्तम गुण मिळवून उत्तीर्ण झाल्या. त्यांच्या कडून प्रेरणा घेऊन डिसेंबर २२ मध्ये अजून सहा जणी आणि जुलै २३ मध्ये अजून सहा जणी अशा एकूण १८ मुलींनी प्रारंभिक संवादिनीचे प्रमाणपत्र प्राप्त केले. महिलांच्या मेळाव्यात 'देहाची तिजोरी' या अभंगाचे मुलींनी सादरीकरण केले. शाळेतही एक-दोन जणींनी गाणी वाजविली. हळूहळू मुलींमध्ये वाद्याविषयी आवड निर्माण झाल्यावर आणि पाया थोडा तयार झाल्यावर जन गण मन हे राष्ट्रगीत, सुखकर्ता दुखहर्ता ही गणपतीची आरती, देहाची तिजोरी हा अभंग शिकविला. जुलै २३ मध्ये पुण्याच्या प्रबोधिनीत आषाढी कार्यक्रमात एका गटानी 'तुझी आण वाहिन गा देवराया' ही धून ही सादर केली.

मुलींचा उत्साह आणि प्रगती बघून त्यांना अजून प्रोत्साहन मिळण्याच्या उद्देशाने जुलै २०२४ मध्ये आषाढी एकादशी आपण वेल्ह्यातील नवीन वास्तुतच का करू नये असे वाटले. या कल्पनेचेही स्वागतच झाले आणि प्रतिभाताई, सुरजदादा, कुंदाताई यांचे उत्स्फूर्त सहकार्य लाभले. निवासातील शालेय मुली, महाविद्यालयीन युवती, कार्यकर्त्या अशा विविध गटांकडून ४/५ अभंग/धून बसवून घेतल्या. सर्वांनी त्यासाठी विशेष मेहनत घेतली. त्या दिवशी विठ्ठल रखुमाईची मूर्ती, रांगोळी, पताका असे पवित्र मंगलमय वातावरण सर्व निवासातील मुलींनी प्रतिभाताईंच्या मार्गदर्शनाखाली अतिशय उत्साहाने तयार केले. या कार्यक्रमात सहनिवासातील कार्यकर्त्या, मुली तसेच स्थानिक कलाकारांनाही अभंग सादरीकरणाची संधी देण्यात आली. गांधर्व महाविद्यालय पुणेच्या संगीत गुरुकुल मधील विद्यार्थी- विद्यार्थिनींच्या अभंग गायन, वादन आणि अभंगावर सादर केलेल्या नृत्याने कार्यक्रमाची सांगता झाली.

सुरुवातीला समोर यायला, बोलायला लाजणाऱ्या मुली आता दोन अडीच वर्षांनी मोकळेपणाने बोलायला लागल्या आहेत. त्यांना काय शिकायची इच्छा आहे ते व्यक्त करू लागल्या आहेत. लय आणि सुराची त्यांची समज बऱ्यापैकी वाढली आहे. भेट द्यायला आलेल्या पाहुण्यांना पण वाजवून दाखवल्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढला आहे.

काही काळ स्थानिकांसाठीचा खंडित झालेला वर्ग वेल्हा येथे ऑगस्ट २०२४ पासून पुन्हा सुरू करत आहोत. ग्रामीण भागातील सांस्कृतिक विकास तसेच नागरिकांच्या व्यक्तिमत्त्व विकासास या संगीत वर्गाचा नक्कीच हातभार लागेल अशी खात्री आहे. आषाढीच्या मुहूर्तावर सुरू झालेल्या संगीत कार्यक्रमाची शृंखला द्वैमासिक विविध सांस्कृतिक/सांगीतिक कार्यक्रम करून चालू ठेवण्याचा मानस आहे.

या सर्व संगीत वर्गास सर्वांचा सकारात्मक प्रतिसाद मिळाला याचे मोल विशेष आहे. आपल्याकडे जे आहे ते वाटून त्याचा आनंद सर्वांना घेता आला पाहिजे या शिकवणुकीचे काही प्रमाणात अनुसरण करण्याची संधी सुवर्णाताईंनी मला दिली त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार!

## बालवाडी

- दुर्गम भागातील लहान मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी २०१२ पासून ग्रामीण भागात गावाच्या वाडी, वस्तीवरील मुलांसाठी (जिथे शासनाची बालवाडी नाही अशा ठिकाणी) ज्ञान प्रबोधिनीच्यावतीने १३ बालवाड्या चालवायला सुरुवात केली. गेली १२ वर्ष सातत्याने घेतलेल्या दरमहा प्रशिक्षणामुळे आपण घेत असणाऱ्या बालवाडी ताईंचे प्रशिक्षण उत्तम प्रकारे चालू होते. त्यामुळे मोठ्या गावातील बालवाडीतील मुलांची संख्या ही वाढली. परिणामतः आजपर्यंत ४ बालवाड्यांमधील विद्यार्थी संख्या पुरेशी झाल्यामुळे शासनाने त्या बालवाड्या चालवायला घेतल्या.
- २०२३-२४ मध्ये ५ बालवाड्या सुरू होत्या. या बालवाडीतील मुले पाहिल्या इयत्तेत गेली. येत्या २०२४-२५ मध्ये बालवाडीत येणाऱ्या मुलांची गावातील, वस्तीतील संख्या २ किंवा ३ इतकी कमी असल्यामुळे बालवाडी या प्रकल्पाचा हेतू पूर्ण झाल्यामुळे २०२४-२५ पासून हा प्रकल्प बंद करण्यात आला आहे.





# रोटरी क्लबच्या मदतीने....

## अर्थसखी

- अर्थसखी प्रकल्पाअंतर्गत ग्रामीण भागातील महिलांना आर्थिक व्यवहार चोख करता येणे, आर्थिक व्यवहार करताना महिलांच्या मनात असणारी भीती कमी करणे आणि महिलांना अर्थिक व्यवहार सहज करता येणे यासाठी महिलांना आर्थिक साक्षर करत रहावे लागते. या हेतूने अर्थसखी हा प्रकल्प करत आहोत.
- या प्रकल्पा अंतर्गत एकूण ७८ लोकांची आधार कार्ड, पॅन कार्ड, बँक खाते, विमा व online payment करणे अशी कामे झाली.



आधार कार्डचे झालेले काम

**जाणीव–जागृती –** आधार कार्ड, पॅन कार्ड, बँक खाते, विमा व PPF खाते, google pay, UPI द्वारे व्यवहार करणे, चेक वाचणे या विषयावर जाणीव जागृती कार्यक्रम घेण्यात आले त्यामध्ये २५०सदस्यांचा सहभाग होता. अर्थसखी प्रकल्प गावात जाऊन घेण्यासाठी ५ प्रशिक्षणे झाली त्यामध्ये ३२ युवती व महिलांनी सहभाग घेतला. अर्थसखी टप्पा ४ मध्ये वेल्हे तालुक्यातील दुर्गम गावांमध्ये जाऊन जाणीव–जागृती व प्रत्यक्ष कामे करण्याचे नियोजन केले गेले. एकूण १६ गावांत मिळून २१० लोकांची १० प्रकारची कामे केली. तसेच १८२ लोकांची ५ विषयातील जाणीव–जागृती केली.

❁❁❁

**ग्रामीण भागातील सहज होणाऱ्या शिलाई व्यवसायाला चालना मिळावी, त्यातून ग्रामीण महिलेचे उत्पन्न वाढावे यासाठी रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथ व रोटरी क्लब ऑफ पुणे, टिळक रोड यांच्यावतीने एकूण १० शिवणयंत्रांचे वाटप करण्यात आले.**



शिलाई मशीन वाटप



रोटरी क्लब ऑफ पुणे गांधी भवनच्या प्रेसिडेंट पद्मजा जोशी यांची अर्थसखींना भेट

**ज्ञान प्रबोधिनीला दिलेल्या देणग्या आयकर कायद्याच्या परि. ८० (जी) खाली करमुक्त आहेत.**
**'ज्ञान प्रबोधिनी' या नावाने धनादेश काढावा**

संपर्क : ज्ञान प्रबोधिनी : स्त्री-शक्ती प्रबोधन (ग्रामीण),
५१० सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३० दूरभाष : (०२०) २४२०७१६२/१३३
★ शिवापूर : खेड-शिवापूर वाडा, ता. हवेली, जि. पुणे ४१२ २०५, ★ नसरापूर : ता. भोर, जि. पुणे
★ आंबवणे : मातृछाया, ता. वेल्हे, जिल्हा पुणे ★ वेल्हे : पोलिस स्टेशन जवळ, ता. वेल्हे, जिल्हा पुणे



सहनिवास मुली संगीत वर्ग



काशीबाई नवले शेतकी महाविद्यालय
एन.एस.एस कॅम्प अडवली



युवतींची मुंबई
मंत्रालयाला भेट




निगडी पालकांची कामाला भेट



सहनिवास मुलींची – सदर्न कमांड पुणे येथे सहल



रोटरी क्लब ऑफ पुणे, सारसबाग दिवाळी फराळ भेट




मा.संचालक व कार्यवाह यांची
संपदा प्रकल्पाला भेट




फिन्स्ट्रा कंपनी स्टॉल




किशोर–किशोरी विकास उपक्रम
भाजी विक्री अनुभव




दलावरील गोष्ट वाचन



स्वाधार प्रकल्प - दल वनभोजन



पासली गावातील दलातील मुलींची दहिहंडी



हरित उर्जा प्रकल्प - पॅलेट उत्पादन




हिरकणी सत्र




स्वाधार प्रकल्प - बचत गट



सहनिवास पालकांची ज्ञान प्रबोधनी, पुणे येथे भेट



वेल्हे केंद्रात झालेला संगणक प्रशिक्षण वर्ग



कातकरी विकास प्रकल्प शिष्यवृत्ती देताना

## ज्ञान प्रबोधिनी
# स्त्री-शक्ती प्रबोधन

५१०, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.
दूरभाष क्र. : (०२०) २४२०७०००/१६२
www.jnanaprabodhini.org ssprabodhan@jnanaprabodhini.org